# मलाला

## पाकिस्तानची एक शूर मुलगी



जीनत विंटर

# मलाला

## पाकिस्तानची एक शूर मुलगी

जीनत विंटर



मराठी : अश्विनी बर्वे

# मलाला यूसूफ़जई

मलालाचा  जन्म पाकिस्तानच्या स्वात घाटीच्या छोट्या शहरात मिंगोरा मध्ये झाला. ती तिथं आपल्या आई-वडील आणि दोन भावांबरोबर राहत होती. मलालाने लवकरच शाळेत जायला सुरुवात केली कारण तिचे वडील तिथं शाळा चालवत होते.मलाला अभ्यासात खूप हुशार होती.

जेव्हा धार्मिकपंथीय गट तालिबानने स्वात घाटीमध्ये सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांनी मुलींना शाळेत जाण्यास बंदी घातली.. मलालाने आपल्या वडिलांना विचारले, “मुलींनी शाळेत जाऊ नये असे त्यांना का वाटते?”

“ते लेखणीला घाबरतात,” तिच्या वडिलांनी उत्तर दिले.

जेव्हा मलाला केवळ ११ वर्षाची होती, तेव्हा तिने पहिल्यांदा सार्वजनिकरित्या मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आवाज उठवला. तेव्हा तालिबानी अधिक आक्रामक झाले, तरीही मलालाने आपलं बोलणं चालूच ठेवलं. धमक्या येतच राहिल्या. पण तरीही तालिबानी मलालाला बोलण्यापासून रोखू शकले नाही. शेवटी जेव्हा मलाला शाळेच्या गाडीतून जात होती तेव्हा एका तालिबानी फौजीने मलालावर गोळी चालवली. गोळी तिच्या डोकं आणि मानेतून खांद्यात जाऊन बसली. मलालाचा अनेक दवाखान्यात इलाज करण्यात आला. शेवटी इंग्लडच्या क्वीन एलिजाबेथ दवाखान्यात बकिंगहम इथे ती बरी झाली. आता मलाला तिथेच आपल्या कुटुंबांसहित राहते.

मलालाला तिच्या शौर्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले, ज्यात आंतर-राष्ट्रीय बाल शांती पुरस्कार (उपविजेता), पाकिस्तान राष्ट्रीय युवा शांती पुरस्कार, सामाजिक न्यायासाठी मदर टेरेसा मेमोरियल आंतरर्राष्ट्रीय पुरस्कार आणि शांती आणि मानवतेसाठी रोम पुरस्काराचा समावेश आहे. 2013 मध्ये एक नोबेल शांती पुरस्कार मिळाला.

मलालाने अन्यायाच्या विरुद्ध सतत बोलणे चालूच ठेवले.

संकटातून वाचण्यासाठी प्रार्थना नका करू,
उलट त्याचा सामना करतांना निर्भय होवू या..

रविंद्रनाथ टैगोर





"मलाला कोण आहे?" तालिबानी शिपायाने शाळेच्या गाडीत शोधत विचारलं.





मलाला एक अशी मुलगी होती जी घाबरत नसे,
“मी स्वतःला ज्ञानाने समृद्ध करेन,” ती म्हणाली.

तालिबानी शिपायांनी स्वात घाटीतल्या मुलींना सांगितलं,
“शाळेत जाऊ नका.”

“शिकू नका,” ते म्हणाले.

पण मुलींनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही.
त्या शूर मुली होत्या.



शाळेचा वर्ग विद्यार्थांना सूर्याच्या उष्णतेपासून आणि धमक्यांच्या धोक्यापासून वाचवत असे.

पण शाळेच्या बाहेर दूर एक काळा ढग प्रत्येक जागी त्यांचा पाठलाग करत होता.



रोज तालिबानी आपल्या धमक्या प्रसारित करत असत.
“मुलींनी शाळेत जायचं नाही,” ते म्हणत.
पण मलाला एक शूर मुलगी होती जिने त्यांच्या विरुद्ध बंड केले.
“मला शिक्षणाचा अधिकार आहे.
मला खेळण्याचा अधिकार आहे.
मला गाण्याचा अधिकार आहे.
मला बोलण्याचा अधिकार आहे.
मला बाजारात जाण्याचा अधिकार आहे.
मला व्यक्त होण्याचा अधिकार आहे.



स्वात घाटीच्या शूर मुलींनी तालिबानी शिपायांना गुंगारा देण्यासाठी शाळेच्या गणवेशा ऐवजी घरचे साधारण कपडे घालायला सुरुवात केली.

त्यांनी शाळेचा गणवेश घरातच ठेवला.



मलाला परत परत बोलली, तिने परत परत आपला आवाज उठवला.

“ते मला थांबवू शकत नाही.

मी नक्कीच शिक्षण घेणार. मग ते घरात, शाळेत नाहीतर कुठेही असो.”



स्वात घाटीमध्ये बिलकुल शांतता नाही.

तालिबानी शाळा जाळून टाकत आणि बॉम्ब टाकत.



तरीपण मलाला बोलली.

“उग्रवादी, पुस्तकांना आणि लेखणीला घाबरतात.
ते महिलांना घाबरतात.
तालिबानीनी माझा शिक्षणाचा मूळ अधिकार हिसकावून घेण्याची हिंमत कशी केली?”





आता शाळेत जाणं खूप धोक्याचं झालं होतं. सुरक्षेसाठी मुली शाळेची गाडी वापरत. मग एक दिवस एक तालिबानी शिपायाने शाळेची गाडी थांबवली. त्याने आत डोकावून पाहिलं, आणि विचारलं, “मलाला कोण आहे? लवकर सांगा, नाही तर तुम्हांला सगळ्यांना गोळी घालेन.”
मग त्याने मलालावर गोळी चालवली.

गाडी मलालाला स्वात घाटीतल्या छोट्या दवाखान्यात घेवून गेली.

एक हेलीकॉप्टर तिला दूरच्या दवाखान्यात घेवून गेले. मग एक जेट विमानाने समुद्रावरून उडून त्यापेक्षाही मोठ्या दवाखान्यात नेवून पोहचवलं. प्रत्येक दवाखान्यातल्या डॉक्टरांनी मलालाला वाचवण्याचा प्रयत्न केला.



मलालावर चालवलेल्या गोळीचा आवाज सगळ्या जगात पोहचला. सगळ्या ठिकाणी मुलं-मुली, स्त्री-पुरुष यांनी मलालाला बरी व्हावी म्हणून प्रार्थना केली. हळूहळू मलाला बेशुद्धीतून जागी झाली. तिने आपले डोळे उघडले आणि मग हातात एक पुस्तक घेवून हसली. मग तिचा आवाजही परत आला.



आपल्या १६व्या वाढदिवशी मलाला विश्वातल्या नेत्यांसमोर उभं राहून परत बोलली,पहिल्यापेक्षा अधिक निर्धाराने.

“त्यांना वाटलं की गोळ्या आम्हांला गप्प करतील, पण ते त्यात नापास झाले.”

एक विद्यार्थी, एक शिक्षक, एक पुस्तक, एक लेखणी जगाला बदलू शकते. मग सगळ्या जगाने पाकिस्तानच्या या शूर मुलीचा आवाज ऐकला.

